S/Wrml, B.P.Let /tcp patil.Letr.doc

# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
## ठाणे शाखा

जा. क्र.बांप/मौ.आसनगांव/ता.शहापूर/स.नं.११७/१/क/
ससंठाणे/ १९३८

सहायक संचालक, नगर रचना,
ठाणे, जिल्हाधिकारी इमारत,
३ रा मजला, कोर्ट नाका,
ठाणे (प)
दूरध्वनी क्र.:-०२२/२५३४२७४४
ई-मेल-adtp_thane@rediffmail.com
दिनांक० ८/१२/२०२०

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
ठाणे.

विषय :- मौ. आसनगांव, ता. शहापूर येथील स. नं. ११७/१/क, एकूण क्षेत्र- ३७००.०० चौ. मी. जागेवर रहिवास व वाणिज्य (Convenience Shopping) या प्रयोजनासाठीच्या बांधकाम नकाशांना मंजुरीसाठी शिफारस मिळणेबाबत.
१) जागा मालकाचे नाव- श्री. वामन काशिनाथ चंदे व इतर-६
२) वास्तुविशारद/इंजिनिअर यांचे नाव- वैष्णवी असोसिएटस्

संदर्भ :- १) मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसूल/क-१/टे-११/ बांप/एसआर- ११३/२०१९, दि. २३/१०/२०१९. (या कार्यालयास प्राप्त दि. ३१/१०/२०१९).
२) या कार्यालयाचे आपल्या कार्यालयास त्रुटी पत्र क्र. मा.आसनगांव/ ता.शहापूर/स.नं.११७/१/क/त्रुटीपत्र/ससंठाणे/३६०, दि.०३/०२/२०२०,(प्रत अर्जदारास).
३) अर्जदार यांचे दि. ७/११/२०१९, दि. १७/०२/२०२० व दि.०९/११/२०२० रोजीचे पत्र व बांधकाम नकाशे.

महोदय,

संदर्भित पत्र क्र. १ अन्वये मौ. आसनगांव, ता. शहापूर येथील स.नं. ११७/१/क, एकूण क्षेत्र- ३७००.०० चौ. मी. या जागेवर रहिवास व वाणिज्य (Convenience Shopping) प्रयोजनासाठी बांधकाम नकाशांना मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव आपल्या कार्यालयाकडून या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी असल्याने या कार्यालयाने संदर्भित पत्र क्र. २ अन्वये त्रुटींची पूर्तता करणेबाबत आपल्या कार्यालयास कळविलेले आहे. त्याची प्रत अर्जदारास दिलेली आहे. त्यानुषंगाने अर्जदार यांनी संदर्भित पत्र क्र. ३ अन्वये कागदपत्रे/बांधकाम नकाशे या कार्यालयास सादर केलेली आहेत. अर्जदार यांनी सादर केलेले कागदपत्रे/बांधकाम नकाशानुसार या कार्यालयाचे अभिप्राय सादर करण्यात येत आहेत.

मौ. आसनगांव, ता. शहापूर येथील स. नं. ११७/१/क, एकूण क्षेत्र- ३७००.०० चौ. मी. ही जागा मंजूर प्रादेशिक योजना ठाणे-पालघर-रायगड मध्ये आसनगांव विकास केंद्रांत बहुतांशी भाग वन व अंशतः भाग शेती/ना-विकास विभागामध्ये अंतर्भुत होत आहे. मूळ गावठाणापासून १००० मी. अंतराच्या आत स्थित आहे. तसेच विकास केंद्राच्या प्रसिध्द नकाशानुसार संपुर्ण जागा शेती विभागात अंतर्भुत आहे.

३०